MHST110000532017 **राजेश चिकणे वि. नथू चिकणे**

**<u>नियमीत दिवाणी मुकदमा क्र.०७/२०१७ मधील निशाणी क्र.४० वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा दुरुस्ती करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन की, वादीने प्रतिवादींविरुद्ध सरस निरस मानाने वाटपाचा दावा दाखल केलेला आहे. दावा कलम १ (क) मध्ये दावा मिळकत अथवा वडिलोपार्जित कोणतीही मिळकत विक्री करु नये अशी मागणी केलेली आहे. असे असताना प्रतिवादी क्र.१ याने मौजे नेवेकरवाडी, ता.जावली येथील वडिलोपार्जित मिळकत गट/स.नं.११४ क्षेत्र १.८९ पो.ख.०.०४ आर क्षेत्र संपूर्ण क्षेत्र दि.२५.०३.२०२१ रोजी रजिस्टर खरेदीपत्राने तेजस्विनी संजय वीरकर, रा. दरे बु.पो.आलेवाडी, ता.जावली यांना विक्री केलेली असलेचे निदर्शनास आलेले आहे व त्यामुळे वादीला दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक झालेले आहे.

३. दावा कलम १ अ मध्ये अ.नं.६ चे खाली "नं.७ ग.नं.११४ क्षेत्र १.८९ आकार ८.०० पैसे संपुर्ण हिस्सा" तर दावा प्रतिवादीचे कॉलममध्ये प्रतिवादी क्र.२ चे नावाखाली (नं.३) तेजस्विनी संजय वीरकर, वय–३६ वर्षे, धंदा–शेती, रा.दरे बु., पो.आलेवाडी, ता. जावली, जि. सातारा, (नं.४) जगुबाई रामू जाधव, वय– ७५ वर्षे, धंदा–गृहिणी, रा.खानापूर, ता.वाई, जि.सातारा, (नं.५) गोदाबाई नामदेव मोहिते, वय–६९, धंदा–गृहिणी, रा.सर्जापूर, ता. जावली, जि.सातारा असा नावांचा समावेश दाव्यामध्ये करणे आवश्यक आहे असे नमूद करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र.१ यांनी नि.क्र. ४५ वर सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी क्र.१ यांच्या कथनाप्रमाणे, प्रस्तुत दाव्याचे कामी मुद्दे काढण्यात

आलेले असून वादीने दाव्याचे कामी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असून दाव्याचे कामकाज वादीचा उलटतपास घेणेसाठी प्रलंबित आहे. त्यामुळे वादीचा सदरचा दावा हा चौकशीच्या स्टेजला असताना वादीला दावा दुरुस्ती करुन मागता येणार नाही. तसेच वादीने सदर मिळकतीचे खरेदीदारास दाव्याचे कामी समाविष्ठ करणेची केलेली मागणी मुदतीत नाही. सबब, वादीचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

५. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांच्याविरुद्ध वाटपासाठी दाखल केलेला आहे. दावा प्रलंबित असताना दावा मिळकतीचे हस्तांतरण झालेले आहे अशा परिस्थितीत वादी हे सदर खरेदीदार यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील करु इच्छीत आहेत. वादीची मागणी ही मुदतीत आहे अथवा नाही ही बाब गुणदोषावर ठरेल. तांत्रिकदृष्टया दाव्यात अदयाप पुरावा सुरु झालेला नाही. त्यामुळे, सदर दुरुस्तीने दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करणे उचित होईल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादी यांचा अर्ज (निशाणी क्र.४०) मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी सदरची दुरुस्ती दाव्यात १४ दिवसांचे आत करावी. तसेच दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2024.12.12 17:19:31 +0530

ठिकाण – मेढा (रविंद्र भ. खवले)

दिनांक –१०.१२.२०२४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा